# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, FEBRUARY 2021 | NO. 2


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र ३७:१-१०**

१) दुष्कर्म्यावर जखफळू नको, अधर्म करणाऱ्यांचा हेवा करू नको.

२) कारण ते गवताप्रमाणे लवकर कापले जातात, हिरवळीसारखे वाळून जातात.

३) परमेश्वरावर भाव ठेव व सदाचारानें वाग, देशांत वस्ती करून राहा, सत्याचे अवलंबन कर.

४) म्हणजे परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल. तो तुझे मनोरथ पुर्ण करील.

५) आपला जीवनक्रम परमेश्वराकडे सोपवून दे, त्याजवर भाव ठेव म्हणजे तो तुझी कार्यसिध्दी करील.

६) तो तुझी धार्मिकता प्रकाशासारखी, तुझे न्यायत्व मध्यान्हासारखे प्रगट करील.

७) परमेश्वराच्या अधीन होऊन स्वस्थ राहा, त्याची प्रतीक्षा शांतपणे करून राहा. जो मनुष्य आपल्या मार्गाने उत्कर्ष पावतो, जो मनुष्य दृष्ट संकल्प सिध्दीस नेतो त्याजवर जळफळू नको.

८) राग सोडून दे, क्रोधाविष्टपाचा त्याग कर, जळफळू नको, अशाने दुष्कर्माकडे प्रवृत्ति होते.

९)दुष्कर्म्यांचा उच्छेद होईल. पण परमेश्वराची प्रतीक्षा करणारे पृथ्वीचे वतन पावतील.

१०) थोडक्याच अवधीत दुर्जन नाहीसा होईल, तूं त्याचे ठिकाण शोधिशील पण त्याचा पत्ता लागणार नाही.

## THE INHERITANCE OF GOD'S CHILDREN

# देवाच्या लेकरांचा वारसा !

पास्टर एस.सॅम. सेलवाराज

**"तरी आता हे याकोबा, तुझा उत्पन्नकर्ता, आणि हे इस्त्राएला, तुझा निर्माणकर्ता परमेश्वर, असे म्हणतो, भिऊ नको, कारण मी तुला सोडविले आहे. मी तुला तुझ्या नावाने हाक मारिली आहे. तूं माझा आहेस."** (यशुया ४३:१)

येथे आपण देवाचे आश्चर्यकारक अभिवचन पहातो, ते काही जगातील सर्व लोकांच्या मालकीचे नाही. पवित्र शास्त्रात आढळणारी सर्व अभिवचने, ही त्याच्या लेकरांकरिता आहेत. अधीक स्पष्ट बोलावयाचे झाल्यास, ही अभिवचने ज्यांनी प्रभु येशू ख्रिस्ताचा त्यांचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार केलेला आहे, आणि पवित्रतेचे जीवन जगत आहेत, त्यांच्या आज्ञांचे पालन करीत आहेत, आणि रोम १२:२ वचना नुसार मनाच्या नवीकरणा द्वारे स्वत:त बद्दल झाल्याचा अनुभव घेत आहेत.

तो/ती समाजात प्रतिष्ठित आहे यामुळे, किंवा राजकारणात पुढारी आहे. म्हणून त्याच्या / तिच्या पर्यंत ही अभिवचने पोहचत नाहीत. वरील प्रमाणे म्हटल्याप्रमाणे ती अभिवचने जे मनाच्या नवीनीकरणात द्वारे बदलत आहेत. त्यांच्या पर्यंतच पोहचतात. अशा व्यक्तीचे मन द्वेण आणि दृष्ट विचारांपासून मुक्त असते आणि विचार स्वच्छ असतात. मनाच्या नवीकरणासाठी येशू शिवाय अन्य कोणताही मार्ग नाही.

ज्या पध्दतीने मार्गाने येशू ख्रिस्त व्यक्ति मध्येबद्दल घडवितो तो अभ्दुत असा आहे. जगातील इतर कोणत्याही गोष्टीत, किंवा धन, किर्ती किंवा कोणतीही शक्ति व्यक्तित्व तशा प्रकारचा बदल करण्याचे सामर्थ्य नाही. येशूवर विश्वास ठेवा आणि बदला! तुम्हाला ते पाहातील तुमच्यावर भरोसा करतील, तुमच्यावर प्रेम करतील.

माझ्या पाळकांनी, जी सुंदरम यांनी एकदा एक घटना सांगितली. एका कुटूंबातील एक मुलगा त्यांच्या वाईट मित्रांच्या प्रभावामुळे आई-वडीलांना पासून दूर निघून जाण्याचा प्रयत्न केला. आई-वडिलांनी त्याला तसे न करण्याबद्दल पुष्कळ समजाविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याने त्यांचे ऐकले नाही. आईने देखील विनंती केली परंतु त्याने तीचे देखील ऐकले नाही. सरते शेवटी आईने मुलाला म्हटले, "बाळा, मला तुझ्या शर्टावर काही शब्द शिवण करू दे." तू न चुकता सर्व परीस्थीतीत तो शर्ट घालीत जा. तीने असे शब्द शिवले, "मी

*(पान २ वर .....)*

# ECHO OF HIS CALL

**2019 - GOLDEN JUBILEE YEAR**

## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.




**“लढाईच्या दिवसासाठी घोडा सज्ज करितात,**
**पण यश देणे परमेश्वरांकडे असते”**
नितीसुत्रे २१:३१



*from Editors...*

खिस्त येशू मधील माझ्या प्रिय मित्रांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा देतो!
तुम्ही कसे आहा?

देवाने आपल्याला त्याच्या स्वर्गीय प्रितिमध्ये कशा अभ्दुत रीतीने जोडले याचा आणि तुम्हा सर्वांचा विचार करतो तेव्हा आमचे मन आनंदाने भरून जाते. होय, आपले संबंध जगीक नाहीत. तर ते अनंतकालीक असे आहेत. आम्ही तुमची आणी तुमच्या प्रिय जनांची कृपेच्या राजासनाजवळ आठवण करण्यास (प्रार्थना करण्यास) विसरत नाही. हे ऐकून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. देव निश्चितपणे तुमच्या सर्व मार्गात तुमचे रक्षण करील आणि तुम्हाला आशिर्वाद देईल. तो तुमचा त्याग करणार नाही. तुम्हाला सोडणार नाही. आपला प्रभु देव येशू ख्रिस्त तो म्हणतो. “मी तुजबरोबर आपला करार स्थापीत करीन तेव्हा तुला समजेल की मी परमेश्वर आहे.” (यहेज्केल १६:६२)

आमच्याकडे लोकांचे जे नुकसान झाले आहे. त्या सबंधीच्या बातम्या जगातील वेगवेगळ्या भागातुन येत आहेत. तरी देखील या महामारीच्या दिवसात देव आम्हाला सुरक्षित ठेवीत आहे. त्यामुळे आम्हांला त्याचे आभारी रहावयाचे आहे.

आमच्या मिशन श्रेत्रातील मंडळ्यांची आणि त्यांच्या सभासदांची, प्रकाशनांची, सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन शाळेची, नहेम्या बायबल कॉलेज, टपालाद्वारे करण्यात येत असलेला बायबलकोर अभ्याक्रम व्यवस्थापनाची, अर्थव्यवस्थेची काळजी घेण्यात व्यस्त आहोत.

अनेक प्रकारच्या अवर्णनीय प्रतिकुल परिस्थितीत देखील, आम्ही आमच्या सर्व दैनंदिन कार्यक्रमात देवाचा हात कार्य करीत असलेला पहावयास मिळत आहोत. आपण पाहात आहोत, या महामरीच्या भीतीमुळे आणि असुरक्षिततेच्या भावनेमुळे लोकांच्या मनावर विपरीत परिणाम झालेला पहावयास मिळत आहे. आर्थिक बांबीमध्ये आम्ही देखील कठीण परिस्थितीतील सामोरे जात आहोत. असा ही परिस्थितीत आम्हांला देवाचे अवर्णनीय असे अभिवचन आहे.”

“..... देवावर प्रिती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकलपाप्रमाणे बोलाविलेल्यांस सर्व काही त्यांच्या कल्याणार्थ सहकारी असे होते.” (रोम ८:२८)

तुम्ही देखील कोणत्याही प्रकारच्या त्रासांतुन जात असाल, तर कृपया लक्षात असू दया कि आपला प्रभु येशू ख्रिस्त तुमच्या सर्व परिस्थितीत तुमच्या सोबत आहे.

आमच्या मंडळ्यांचे आणि इतर सर्व कार्यक्रम व्यवस्थित सुरू आहेत. तुमच्य प्रार्थना आणि पाठबलाबद्दल आभार मानीत आहोत. देव तुम्हाला आशीर्वाद देवो!

तुमच्या द्वारा
**पास्टर सॅम. एस. सेल्वाराज**

*(पान १ वरून .....)*

राजघराण्याच्या रक्ताच्या मालकीचा आहे.” त्याने तो शर्ट परिधान केला. बायबल मधील ज्या उधळया पुत्राविषयी आपण वाचतो. त्याच्या प्रमाणेच त्या मुलाने त्याचे सर्व पैसे खर्च केले, आणि प्रकृती स्वास्थ देखील

**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th.,M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.

**Hd. Qrs. CO-ORDINATORS**
Bro. John Rodrigues
Sis. E. Daisy Rani

**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street
Chepauk, Chennai- 600 005, India.

**Phone :** (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
**Cell :** (+91) 98410 71852, 95661 31858
**E-mail :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) · BIBLECOR - Postal Courses (3 languages) · Theological Correspondence Courses (2 languages) · Church Planting · Nehemiah Bible Colleges · Gospel Printing Press · Great Commission Partners · St. Paul’s Matriculation School · Crusades · Community Development

*(पान २ वरून .....)*

गमावले आणि मरणाच्या पंथाला लागला. त्या परीस्थीत असताना शर्टवरील शब्द, त्याच्याशी बोलू लागले.

"मी राजघराण्याच्या रक्ताच्या मालकीचा आहे." या शब्दांनी त्याच्या अंतकरणाला स्पर्श केला. पुढे, तो विचार करू लागला, कां मी अशाप्रकारचे गलीच्छ जीवन जगावे. सरते शेवटी तो त्यांच्या आई-वडिलांना शोधू लागला. त्याला पाहाताच त्याच्या आई-वडिलांनी त्याला प्रेमाने जवळ घेतले. त्याला मिठी मारीली. आणि मग तो कुटूंबात सामील झाला.

एज्रा बाबेल मधून यरूशलेमास आला, तेव्हा त्याने इस्त्राएल लोकांची स्थिती पाहिली. "पवित्र बीज देशोदेशीच्या लोकांत मिसळून गेले आहे." असे त्याने पाहिले. (एज्रा ९:२ ब)

देवाच्या प्रियांनो, जगाच्या उत्पत्तिच्या अगोदर पासुन देवाने तुम्हाला निवडीले आहे. तेव्हा स्वत:ला कमी लेखू नका. तुम्ही खास! विशेष असे आहात दाविदा प्रमाणे तुम्ही देखील देवाला सांगू शकता, "तु माझा वतन भाग आहे." (स्तोत्र ११९:५७) आणि देव देखील तुम्हाकडे बघून म्हणतो.

"तुम्ही माझे आहात" जग कदाचित तुम्हाला वाईट रीतीने वागवेल, कदाचित तुम्हाला दु:खापत करील. परंतु तुम्हाला बोलवितो. तो विश्वसनिय आहे. तो चांगला आणि विश्वासनिय देव आहे.

हे जग ज्या देवाने निर्माण केले त्या देवाने तुम्हाला तुमच्या नावाने हाक मारीलली आहे. तुमच्या पालकांनी कदाचीत तुमचे नांव ठेविलेले असेल. परंतु मातेच्या उदरांत असताना ज्याने तुम्हाला निवडीले त्यानेच ते नांव दिलेले आहे. मी एकदा माझ्या आईला विचारले, "तू माझे नॉव सॅम सेल्वराज का ठेविले? तीने उत्तर दिले की मी कुटुंबाची संपत्ती आहे."

होय, शमुबेल एक महान असे संदेष्टा होता. "सेल्वा राज" या नावाचा अर्थ, "संपत्तीचा राजा" त्यानी असे सुंदर नांव दिल्याचा मला आनंद आला. एका वयस्कर उपदेशकाने म्हटले,"आपल्या देवाने आपण मातेच्या उदरात असतानाच आपल्या प्रत्येकाला नाव देऊन ठेवले." तेव्हा, मला समजले की मला सॅम सेलवाराज राज हे नांव देणारा माझा देवच होता. तुमचे नाव देखील त्यानेच ठेविले आहे.

देवाचा दूत योसेफा पुढे प्रगट झाला आणि म्हणाला, ती (मारिया) पुत्र प्रसवेल, आणि तूं त्याचे नांव येशू ठेव, कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील." (मत्तय १:२१) येशू या नावाचा अर्थ, "कारण तो आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील." लूक १:१३

या वचनात देखील आपल्याला पाहावयाच मिळते. की ते म्हणजे देवदूताने जखऱ्याला दर्शन देऊन त्याच्या मुलाचे नांव योहान ठेवण्यास सांगितले.

तेव्हा तुम्ही पालकांनी तुमच्या लेकरांना नांव देताना देवाचे ऐकून त्याचे सुचविल्यानुसार नावे द्यावे. तो तुमच्या मनाशी बोलेल! तुमच्या मुलांची नांवे स्वर्गीय पुस्तकांत लिहिली गेलेली आहेत!

एक दिवस असा येईल की देव आपल्या नावाने आपल्या सर्वांना हाक मारील. देवाच्या पुस्तकात प्रत्येकाची नावे लिहिलेली आहेत. तुम्ही खास असे आहात. देव तुम्हाला सांगतो. "तू जलांतुन चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन. नद्यांतून जाशील तेव्हा त्या तुला बुडवावयाच्या नाहीत. अग्नीतून चालशील तेव्हा तूं भाजावयाचा नाहीस. ज्वाला तुला पोळावयाची नाही." (यशया ४३:२) होय. कठीण परिस्थीती, त्रास आणि दु:खे तुम्हाला इजा पोहचवू शकणार नाहीत. तुम्ही कदाचित विचार कराल."अरे,मी कठीण अशा समयात जीवन जगत आहे. आणि या अशा भयंकर रोग सोशीत आहे. "परंतु ज्या देवाने तुम्हाला बोलाविले तो म्हणतो," तू जलांतून चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन.

ऐका, इतर सर्वांप्रमाणे कदाचीत तुम्हाला देखील जलातुन नद्यांतुन जावे लागेल. कदाचीत अग्नीतून चालावे लागेल. परंतु त्यांच्या द्वारे तुम्हाला इजा पोहचू देणार नाही.

ज्यानंतर आपण यशया ४३:३ मध्ये वाचतो, "कारण मी परमेश्वर तुझा देव आहे, मी इस्त्राएलचा पवित्र प्रभु तुझा त्राता आहे. मी तुझ्याकरीता मिसंर खंडादाखल दिला आहे, तुझ्या बद्दल कुश व सबा दिले आहेत." आपण देवाची लेकरे आहोत आणि त्यामुळे खोट्या साक्षीत कधीच राहणार नाही. आपण कर्जात बुडणार नाही. आपण मंडळीत उपासनेला का बरे येतो? देवाला दान देतो, प्रार्थना आणि उपास या मागचा हेतु काय आहे? या सर्व गोष्टी तुम्हाला ख्रिस्तांच्या अधीक जवळ नेतील! देवावर प्रिती करणाऱ्या सर्वांजवळ धन आणि समाधान येतात. मत्तयं ६:३३ मध्ये आपण वाचतो, "तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धर्मिकता मिळवावयाची खटपट करा," म्हणजे याबरोबर तीही सर्व तुम्हांस मिळतील.

माझी सुरवात जरी गरीबीनी झाली, देवाने आता अशा रीतीने आशीर्वादीत केले आहे. त्याने आपल्याला आगाऊ नेमिले, आपल्या नावाने हाक मारिली, आणि जर आपण त्याला घट्ट धरून राहू तर तो आपल्याला मिसर आणि सबा खंडणी दाखल देईन!

आम्ही अनेकांचा शोकजनक शेवट होताना पाहिला आहे. ते जरी प्रसिध्द व्यक्तिमत्व आणि धनाड्य म्हणून जीवन जगले, परंतु ख्रिस्ताविरहीत, जीवन जगल्यामुळे त्यांचा शेवट एक शोकांतिका होती. देव आपलाकडे वळून म्हणत आहे. "तुं माझ्या दृष्टिने अमोल आहेस," तूं मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुजवर प्रेम करितो, म्हणून तुजबद्दल,तुझ्या जिवाबद्दल, मनुष्यें राष्टें, मी देईन." (यशया ४३:४) तूं माझ्या दृष्टिने मोलवान होतास, तुं माझ्या दृष्टिने मोलवान

**एको ऑफ हिज कॉल सेवा** कार्य मासिकाच्या वाचकांच्या वर्गणीद्वारे आणि तुमच्या सारख्या स्वेच्छादान देणाऱ्या प्रियजनांच्या पाठबळावर सुरू आहे. "संतोषाने देणारा देवाला आवडतो." (२करिंथ ९:७) पुर्ण खात्रीने - किंमत देऊन कोणत्याही आणि कशाही मार्गाने सारखे होऊन (१ करिंथ ९:२२)

-संपादक

*(पान ३ वरून .....)*

आहेस."

प्रिय भावानो/बहीणींनो, तुम्ही कोणी का असेना, जीवीत असलेला देव म्हणत आहे." तुमच्या वर्तमान कठीण स्थितीबद्दल चिंता करू नका. तुम्ही कदाचित काही त्रासात असाल किंवा कर्जात असाल किंवा रोगाने त्रस्त असाल, किंवा कोणत्यातरी प्रकारच्या वेदनेत जगत आहात, किंवा भुकेले आणि उद्या कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागणार यांच्या चिंतुमुळे निद्रा हीन असाल परंतु देव म्हणत आहे. "तुम्ही माझ्या दृष्टिने मौल्यवान असल्यामुळे तुम्हाला सन्मानित केले आहे आणि मी तुमच्यावर प्रेम केले आहे." त्यामुळे मी तुमच्याबद्दल माणसे देईन आणि तुमच्या जीवनाबद्दल लोक देईन." देवाच्या प्रिय लेकरा, जग तुजकडे, एक कर्जबाजारी व्यक्ति, आजारी व्यक्ती, गरीब किंवा अशिक्षीत व्यक्ति म्हणून पाहू द्या, परंतु देव तुम्हाला म्हणत आहे. "तुं माझ्या दृष्टिने मोल्यवान होतास, म्हणून तुला सन्मानित केले आहे."

बस वाहकासाठी तुम्ही एक सर्व सामान्य प्रवासी असाल! डॉक्टर तुमच्याकडे एक रूग्ण म्हणून पाहिल! परंतु प्रभु म्हणतो, "तुं माझा मोलवान असा मुलगा आहेस, तू माझी मोलवान मुलगी आहेस."

आत्ताच स्वत:स देवाच्या ताब्यात द्या. तो तुम्हांस शुध्द सोन्यात बदलून टाकील. काही जण त्यांची सर्व शक्ति संपुष्टात आल्यावर स्वत:स त्याच्या ताब्यात देतात. तुम्ही धडधाकड अवस्थेतच देव राज्य मिळवा. नितीसुत्रे २८:२० वचनात म्हटले आहे. "स्थिर मनाच्या मनुष्याला आशीर्वादांची रेलचेल होते."

मला हे सांगून शेवट करू द्या:- एकदा मी माझे पाळक पास्टर सॅम सुंदरम यांना पुरासवाकम (चेन्नई) पासुन १५ कि.मी. वर असेलेल्या माझ्या घरी टॅक्सीने नेत होतो. माझ्या खिशात केवळ ३ रूपये २० पैसे होते. टॅक्सी एगमोर पर्यत पोहचली तेव्हा टॅक्सीच्या मीटरवर ३ रूपये २० पैसे झाल्याचे दर्शवीत होते. आणि अंतर तर केवळ अर्धे संपले होते. माझ्या पाळकांना टॅक्सीतुन खाली उतरून माझ्या घरापर्यंत पायी चालत जाऊ या असे बोलू शकलो असतो का? मी अंत:करणात रडून प्रार्थना करीत होतो. टॅक्सी वेगाने पुढे जात होती. परंतु आश्चर्य म्हणजे मीटर ३ रूपय २० पैसे दर्शविल्यानंतर बंद पडले. घरापर्यंत पोहचे पर्यंत मीटर तेवढेच भाडे दर्शवित होते. ड्रायव्हर ने मीटर पाहिले आणि त्याला धक्काच बसला. एवढे लांब अंतर प्रवास करून देखील मीटर केवळ ३ रूपये २० पैसे कसं दाखवत आहे? एगमोर पासुनच मीटर बंद पडले होते. मी ड्रायव्हरला म्हटले, काळजी करू नकोस, मी येथेपर्यंत जे भाडे होत असते ते पुर्णपणे तुला देईन. सध्या हे ३ रूपये २० पैसे व त्या सोबत माझे घडयाळ घे. मी चेन्नईतच रहातो. आपली पुन: भेट होईल तेव्हा बाकी राहिलेले पैसे देईन व घडयाळ परत घेईन. मी त्याला एकूण भाडे किती होऊ शकते असे विचारले.

टॅक्सी ड्रायव्हर ने माझे घडयाळे घेतले नाही. मला त्याने केवळ विचारले, "तुम्ही ख्रिस्ती आहात का?" त्याने मजकडे प्यावयास पाणी मागितले व पाणी पिऊन ३ रूपये २० पैसे न घेताच निघून गेला. मी देवावर प्रेम करीत असल्यामुळे, त्याने मजकरीता तो चमत्कार घडविला. काही वर्षानंतर तो टॅक्सी ड्रायव्हर माझ्या घरी आला. तेव्हा त्यावेळी त्याने माझ्या घरासमोर एक सुंदर अशी नवीन ॲम्बॅसीटर कार पाहिली. ती आश्चर्यचकीत होऊन त्याने मला विचारले." तुमच्या जवळ अशी सुंदर कार असताना माझ्या टॅक्सीतुन प्रवास का केला? मी त्याला म्हटले, "मी त्यावेळी एक गरीब माणूस होतो. त्यावेळेस माझ्या खिशात ३ रूपये २० पैशा पेक्षा अधिक काहीच नव्हते. आता माझ्या देवाने मला आशिर्वाद देऊन गरीबीतुन वर काढले आहे."

"विश्वासु मनुष्यास आशीर्वादांची रेलचेल असेल." जेव्हा मला टॅक्सीचे भाडे भरणे शक्य झाले नाही, तेव्हा देवाने मला नवीन कारचा मालक बनविले. पवित्र शास्त्र म्हणते. "म्हणून मी तुझ्या करिता माणसे आणि तुझ्या जिवाकरिता राष्ट्रे देईन." देव म्हणत आहे तुं माझ्या दृष्टिने मोलवान होतास, म्हणून तुझा सन्मान करण्यात आला आहे."

देव तुझ्याकडे अनेक चांगल्या लोकांना पाठवील. तुझ्या प्रकृति स्वास्थाची आणि सुखाविषयी चौकशी करणारे लोक, तुझ्याकडे असतील. तुझ्या हाताच्या श्रमाने अनेकांना जेवू घालशील. तुझ्या मुखाद्वारे निघणाऱ्या शब्दांनी तूं अनेकांचे सांत्वन करशील. दास जसा मोठ्या अपेक्षेने त्याच्या स्वामीकडे पाहातो, तव्दतच अनेक लोक, तुझ्या मुखाकडे पाहतील. देव तुला पुच्छ नव्हे मस्तक करील. देव खाली पाडणार नाही. तर उंच करील. तुझ्या जीवनाकरिता तो तुला लोक देईल. ते केवळ यामुळे की मी तरूणपणात स्वत:स पवित्र ठेविले, त्यामुळे देवाने आता मला आशीर्वादीत केले.

देवाने तुला आगाऊ ठरवून पाचारण केले. राज कुटूंबातील आहेस. हे दर्शविण्यासाठी त्याचे तुझ्यावर चिन्ह आहे.

२२ जुन १९७१ सालात मी चेन्नईच्या पदपथावर बसलेलो असताना मला भूक लागली. सर्व दुकाने बंद झालेली होती. आणि अशावेळी दोन पोलिस तिथे आले. त्यांनी मला म्हटले, उठ आणि आमच्या बरोबर चल." त्यांना मी राज घराण्यातील आहे ठाऊक नव्हते. त्यांनी मला विचारीले." आता रात्रीचे दोन वाजलेल आहेत आणि तु येथे काय करीत आहेस? मी उत्तर दिले. "माझे येथे कोणीही नाही. परंतु माझा देव मला येथे घेऊन आला आहे."

दोघांपैकी एक जण मला म्हणाला आमच्या बरोबर पोलीस चौकीवर चल. दुसरा म्हणाला नाही, थांब त्याच्या चेहऱ्याकडे पाहून हा चांगल्या कुटुंबातील आहे असे मला वाटते. हा काही चोरासारखा किंवा अंमली पदार्थाच्या व्यसनाधीन असल्यासारखा दिसत नाही. त्यांनी माझ्या विषयी अशी चांगली साक्ष देऊन मला सोडून दिले.

"प्रभु म्हणतो," तू माझा मोल्यावान असा मुलगा आहे. तू माझी मौल्यवान अशी मुलगी आहे. "देव तुला मोठा जनसमुदाय देईल. जगातील तुला तुझ्या बऱ्या वाईट प्रसंगात मदत करतील. ते तुला शुभेच्छा देतील. तुझी स्तुती करतील. देवाचे वचन सांगते." "भिऊ नको, मी तुला सोडविले आहे. तुला तुझ्या नावाने हाक मारीली आहे. तु माझा आहेस." "तु त्या उधळया पुत्राप्रमाणे असू नये. त्याला "मी

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**१९ फेब्रुवारी २०२१ ते १८ मार्च २०२१**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## स्तुति करिता मुद्दे :-

| | |
|---|---|
| १९ फेब्रुवारी :- | आमच्या रविवारच्या उपासना देवाने आशीर्वादीत केल्या. |
| २० फेब्रुवारी :- | नवीन विश्वासणाऱ्याची भर घालून आमच्या मुख्य आणि शाखा मंडळयांस देवाने आशीर्वादीत केले. |
| २१ फेब्रुवारी :- | देवाने आमच्या मुख्य मंडळीतील स्त्रीयांच्या सभेस आशीर्वादीत केले. |
| २२ फेब्रुवारी :- | प्रार्थना आणि दानाद्वारे आधार देणाऱ्या आमच्या सर्व प्रिय जनांबद्दल देवाची स्तुती करू या. |
| २३ फेब्रुवारी :- | आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये छापून सर्व मिशन क्षेत्रांना पाठविण्यात येणारे साहित्य देव आशिर्वादीत करीत आहे. |
| २४ फेब्रुवारी :- | देवाने मणीपुरी, भाषेत मासिक सुरू करण्यास मदत केली. |
| २५ फेब्रुवारी :- | आमच्या एको ऑफ हीज कॉल सेवा इतर भाषांमध्ये विस्तारीत करण्याच्या उद्दीष्टांबद्दल देवाची स्तुती करू या. |
| २६ फेब्रुवारी :- | आमच्या सर्व सहसंपादकांकरिता व त्याच्या कुटुंबियांकरीता स्तुती करू या. |
| २७ फेब्रुवारी :- | एको ऑफ हीज कॉल मासिक आणखीन चार भाषांमध्ये प्रसिध्द करण्यासंबंधीत आमच्या उदिष्टाबद्दल देवाची स्तुती करू या. |
| २८ फेब्रुवारी :- | मुख्य मंडळीतील पुरूषांची सभा देवाने आशीर्वादीत केली. |
| ०१ मार्च :- | मागील महिन्याला आमचे सर्व कार्यक्रम देवाने आशीर्वादीत केले. |
| ०२ मार्च :- | आमच्या मिशन कार्यक्षेत्रातून आम्हांला चांगले अहवाल प्राप्त होत आहेत. |
| ०३ मार्च :- | देव सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ट पाळक पास्टर सॅम सेलवाराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करीत आहेत. |

## प्रार्थने करीती मुद्दे

| | |
|---|---|
| ०४ मार्च :- | या महिन्यातील एको ऑफ हिज कॉल सेवेकरिता आवश्यक असलेला निधी देवाने पुरवावा. |
| ०५ मार्च :- | करोना महामारीचे सुपर्ण जगभरातून उच्चाटन व्हावे या करीता प्रार्थना. |
| ०६ मार्च :- | महामारीमुळे ज्यांना त्यांचे प्रियजन गमवावे लागले, त्या दु:खीत कुटूंबीयांसाठी प्रार्थना करू या. |
| ०७ मार्च :- | बंधु एम. पॉलराज, इंग्रजी मासिकाचे सहसंपादक त्यांना पुर्ण प्रकृति स्वास्थ लाभावे. यासाठी प्रार्थना करा. |
| ०८ मार्च :- | आमच्या मिशन क्षेत्रांतील सेवकांकरिता प्रार्थना करू या. |
| ०९ मार्च :- | जगभरातील सर्व आध्यात्मिक पुढाऱ्यांकरिता प्रार्थना करू या. |
| १० मार्च :- | स्त्रीया आणि लेकरे यांच्यावर होत असलेल्या अत्याचारांचे उच्चांटन व्हावे, पुर्णपणे थांबले जावेत या करिता प्रार्थना करू या. |
| ११ मार्च :- | मणीपुरी, भाषेतील मासिकांचे सहसंपादक रेव्ह डॉ. रिशीकांत सोरोखुईबम यांच्या करिता विशेष प्रार्थना करू या. |
| १२ मार्च :- | एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याकरिता देवाने अधीक समर्पित असे सेवक आणावेत. |
| १३ मार्च :- | सर्व ख्रिस्ती संस्थांकरिता प्रार्थना करू या. |
| १४ मार्च :- | देवाने सर्व पाळकांना आणि समन्वय साधकांना अधीक शक्ति पुरवावी. |
| १५ मार्च :- | आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणी भागीदार, विश्वासांतील भागीदार आजीवन भागीदार आणि महान सेवा कार्यातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता प्रार्थना करू या. |
| १६ मार्च :- | सेवा कार्यातील आर्थिक गरजांकरीता प्रार्थना करू या. |
| १७ मार्च :- | महामारीच्या काळात आजपर्यंतच्या सर्व कार्यात देवाने आशीर्वाद दिला तसाच तो मिळत रहावा याकरिता प्रार्थना करा. |
| १८ मार्च :- | आमच्या वरिष्ट पाळकांचे आणि त्यांच्या कुटंबाला सर्व दृष्ट शक्तिपासून सुरक्षीत राखीत रहावे. यासाठी प्रार्थना करा. |

*(पान ४ वरून .....)*

राजघराण्यातला आहे. याचा अर्थ फार उशीरा समजला. आता या क्षणी संवेदनाक्षम बन." तू राजघराण्यातील आहेस. बायबल म्हणते, "तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय, याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वत:चे लोक असे आहा. यासाठी की ज्याने तुम्हांस अंधकारातुन काढून आपल्या प्रकाशांन पाचारण केले. त्याचे गुण तुम्ही प्रसिध्द करावे (१ पेत्र २:९) तुम्ही खास आहा, प्रभु तुमचे रक्षण करण्याकरीता त्याच्या देवदुताना आज्ञा करील."

आपला देव त्याच्या बाहुली प्रमाणे तुमचे रक्षण करील. तुम्हांला दगडावर पाय आडखळुन ठेच लागणार नाही याकडे तो लक्ष देईल. तुमचा सर्व गरजा पुरविल. आज जर तुम्हांला कशाची तरी भिती वाटत असेल, तर मनुष्यांच्या शब्दांकडे, लक्ष देऊ नका. जग तुम्हाला धमकी देईल. देव काय म्हणत आहे याकडे लक्ष द्या. "घाबरू नको, मी तुम्हाला सोडविले आहे. तुमच्या नावाने मी तुम्हाला हाक मारीली आहे, तुम्ही माझे आहात."

आता तुमच्या छातीवर हाथ ठेवून म्हणा, "मी येशूचा आहे." तो तुम्हास डोळ्यांच्या बाहुली प्रमाणे सांभाळतील. चालत असताना तुमचे रक्षण करील. तुमच्या जीवनातील सर्व गरजा पुरविण्याकडे लक्ष देईल.

आम्ही १६ भाषांमधील लोकांत सेवा करीत असताना देवाने मला सांगितले. "तू दुसऱ्या भाषिक लोकांमध्ये देखील सेवा केली पाहिजे. ती कोणती भाषा हे मला ठाऊक नव्हते. मणीपुर मधील एक पालक मजकडेआले आणि मला म्हणाले, तुमचे मासिक मणीपुर येथून प्रसिध्द करण्याची आमची तयारी आहे. कृपया तुम्ही मला तशी परवानगी द्यावी. "देवाने अतिशय आश्चर्यकारक रितीने मणीपुरी भाषेत एको ऑफ हीज कॉल (मासिक) सुरू करण्यास मदत केली. आणि आता देव मणीपुर मध्ये देखील सामर्थ्यशाली कार्य करीत आहे."

अशा प्रकारे देवाचे कार्य करते. ते कदापी व्यर्थ जाणार नाही. "तुझ्या जीवनाकरिता, मी लोक आणि राष्ट्रे देईन." होय, माझ्या प्रियांनो! तुमच्या वचन बध्दतेच्या बदल्यात, देव तुम्हाला वेगवेगळ्या भाषा बोलणार वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक देईल. आपल्या प्रभुने आपल्याला असे अभिवचन दिले आहे.

तुम्ही देवाचे लोक आहात. तुम्ही त्याचा तुमचा तारणारा म्हणून स्विकार केलेला आहे. तुम्ही त्याची लेकरे आहात. त्याची कृपा आणि प्रेम तुम्हाला मिळाले आहे. मातेच्या उदरात असतानाच त्याने तुम्हांस निवडीले आहे. तो महान असे कार्य करून घेण्यास तुमचा उपयोग करून घेणार आहे. "तूं जलातुन चालशील तेव्हा मी तुजबरोबर असेन, नद्यांतुन जाशील तेव्हा त्या तुला बुडवावयाच्या नाहीत." अग्नीतुन चालशील तेव्हां तूं भाजावयाचा नाहीस. ज्याला तुला पोळावयाचे नाही. "तूं माझा मोलवान मुलगा आहेस. तूं माझी मौलवान मुलगी आहे." देवाला आपली सेवा पाहून आनंद होतो. तो तुमच्याकडे देखील पाहातो आणि म्हणतो, तु माझा मौलवान मुलगा आहेस, तूं माझी मौलवान मुलगी आहेस.

कोणत्याही प्रकारे स्वत:ची कमी लेखू नका. लक्षात असु द्या की, तुम्ही राजघराण्यातील आहात. त्या उधळ्या पुत्राला जशी "मी राज घराण्यातील आहे." याचा अर्थ समजला आणि पश्चाताप करून तो आपल्य आई-वडिलांकडे परतला, तुम्ही देखील आज पश्चाताप करावा. कृपया हे समजून घ्या कि ख्रिस्तांचे रक्त आपल्या मध्ये वहात आहे. तुम्ही त्याच्या रक्ताच्या कोटात (संरक्षणात) आला. आहात. कोणताही अरिष्ट तुजजवळ येणार नाही. तुमच्या जीवनात चांगल्या गोष्टी घडून येतील. तुम्ही दुसऱ्यांना द्याल परंतु कोणाकडूनही उसने घेणार नाही. मागणार नाही. धन्यवाद पवित्र पित्या देव जे काही बोलतो ते घडणार. "यास्तव देवाच्या हाताखाली लीन व्हा, यासाठी की त्याने योग्य वेळी तुम्हांस उंच करावे." (१ पेज ५:६)

---

## कार्यक्षेत्र - अहवाल

सर्वात प्रथम आम्ही (मरारदू कुंटबिय -पंजाब) आपल्या तारणाऱ्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या पवित्र आणि सामर्थी नामात तुम्हा सर्वांना २०२१ या नुतन वर्षाच्या शुभेच्छा देत आहोत.

तुमचे ई-मेल आणि त्यामधील आशीर्वादीत असे उत्तेजनात्मक शब्द वाचून मी वैयक्तीक रित्या अतिशय आनंदीत होतो. हे शब्द आम्हां सर्वांना विश्वासात अधिक बलवान प्रभु परमेश्वरावर आणि त्याच्या पवित्र वचनांच्या बनण्यास उत्तेजन देतात.

मला आणि माझी प्रिय पत्नी नीलम कौर, आम्हा दोघांना, तुम्हा सर्वांना हे कळविण्यात आनंद होत आहे की, डिसेंबर २०२० मध्ये देवाने आम्हांला ज्या लोकांनी येशू ख्रिस्त हे नांव देखील ऐकले नव्हते. अशा लोकांना देव राज्याची सुवार्ता सांगण्याची संधी प्राप्त करून दिली.

पंजाब राज्यातील निरनिराळ्या ठिकाणी जिल्हयात १४ प्रार्थना सभांमध्ये अगदी कडाक्याच्या थंडीत शुभवर्तमान जाहीर करण्यास देवाने आम्हांस शक्य होऊ दिले. त्याच्याच पवित्र नावाला सर्व मान, महीमा आणि गौरव.

"आम्ही आमच्या प्रभु परमेश्वराच्या आमच्या स्वर्गीय पित्याला देखील धन्यवाद देतो, जो आम्हांवरील सर्व संकटात आमचे सांत्वन करितो. असे की ज्या सात्वनाने आम्हांला स्वत:ला देवाकडून सांत्वन मिळते. त्या सांत्वनाने आम्ही, जे कोणी कोणत्याही संकटात आहेत त्यांचे सांत्वन करण्यास समर्थ व्हावे." (२ करिंथ १:३-४)

आम्ही तुमच्या करिता तुमच्या कुटंबाकरिता आणि १९६९ सालापासुन अतिशय प्रामाणिक जी सेवा तुम्ही करिता आला आहात. त्या सेविकरिता न चुकता सतत प्रार्थना करित आहोत. देव ख्रिस्त येशूच्या नामात तुमची प्रत्येक गरज पुरवील याची आम्हांला खात्री आहे. त्याच्या राज्यात कशाचेही उणे नाही. त्याजवर आणि त्याच्या पवित्र वचनावर आमचा पुर्ण भरोसा आहे. तो अशक्यातुन शक्य निर्माण करणारा आहे. त्याला अवघड आणि अशक्य असे काही नाही.

**रेव्ह शानशेर सिंग माररदू, पंजाब**

# सर्व धर्म शास्त्र पुर्ण करण्यासाठी

तिबिर्य कैसर यांच्या राज्याच्या पंधराव्या वर्षी किंवा आपल्या वर्तमान कालगणनेनुसार इ.स. ३० मध्ये जखऱ्याचा आणि अलिशीबा यांच्या पुत्रास योहान यास देवाचे वचन प्राप्त झाले. (लुक ३ : १-१३) त्यानंतर त्याने पापक्षमेसाठी पश्चाताप आणि बाप्रिस्मा याचा संदेश देण्यास सुरवात केली. त्याला "बाप्रिस्मा करणारा" अशा नावाने देखील लोक ओळखीत होते. यार्देनेच्या चोहीकडील प्रदेशातील लोक त्याजकडे येते होते. ऐकत होते आणि पापाबद्दल पश्चाताप करीत होते. पश्चातापात भुतकाळातील पापांबद्दलच्या दु:खाबद्दलचा (२ करिंथ ७:१०) आणि पश्चातापास योग्य असे फळ देवून देवाला आवडणारे जीवन जगण्याचा समावेश असतो. (प्र.क्र. ३:१९, २६:२०) त्यांनी पश्चाताप करून पापे पदरी घेतली आणि योहानाने त्यांना सर्देन नदीत बाप्रिस्मा दिला. (मत्तय ३:५-६) बाप्रिस्मा हा शब्दचा त्यांच्या पुर्णपणे पाण्याखाली बुडण्याचा संदर्भ देत आहे.

"तेव्हा येशू योहानापासुन बाप्रिस्मा घेण्याकरिता गालीलाहून यार्देनेवर त्याजकडे (योहानाकडे) आला." परंतु योहान त्याला मना करून म्हणाला मी आपणांपासुन बाप्रिस्मा घ्यावा, असे असता आपण मजकडे येतां काय? येशूने त्याला उत्तर दिले, आता हे होऊ दे, कारण या प्रकारे सर्व धर्म पुर्णपणे पाळणे हे आपणांस योग्य आहे. तेव्हा त्याने त्याच्या म्हणण्या प्रमाणे होऊ दिले." (मत्तय ३:१३-१५)

योहानाचा हेतु मसिहा ही जगाचा आत्मिक उध्दारक त्याच्या कारता मार्ग तयार करणे होता. (लुक ७:२७) आणि मलाखी ३:१) येशूचा विशेष गुण ओळखून योहानाला वाटले की, त्याने येशूचा बाप्रिस्मा करावा यापेक्षा येशूने त्याचा बाप्रिस्मा करावा हे अधीक उत्तम आहे. जे वास्तव्यात व्हावयास हवे होते. त्याच्या अगदी उलट अशी येशूची विनंती होती. कारण येशू देवाची इच्छा जाणून होता. सेवेची सुरवात करताना बाप्रिस्मा घेणे आवश्यक आहे हे त्याला ठाऊक होते. (एक ३:२१-२३) आणि त्याने बाप्रिस्मा घेण्यामागचे कारण सांगितले. - धर्म पुर्णपणे पाळल्याा करिता. त्यामुळे योहानाने यर्दिनेत त्याला बाप्रिस्था दिला. (माक १:९-१०) परंतु येशूला त्या शब्दाद्वारे काय म्हणावयाचे होते? सेवेच्या सुरवातीस बाप्रिस्मा घेण्याबद्दल सर्व धर्म पाळण्याद्वारे येशूने कमीत कमी दोन महत्वाच्या गोष्टी साध्य केल्या.

## येशूने ख्रिस्ती देवाची आज्ञा पाळली.

जेव्हा योग्य वेळ आली देवाने त्याच्या पुत्राला या जगात मोशेच्या नियमांनुसार जीवन जगत असलेल्या यहुदी लोकाहिताच केवळ वाचविण्याकरिता नाही. तर सर्व लोकांकरिता पाठविले (योहान ३:१६, रोम ४:७, ५:२ गलती ४:४ इब्री २:९-१०) निर्दोश पापरहीत आर्पणाद्वारे जगाचे पाप दूर करावे ही जी देवाची योजना ती येशू पूर्ण करणार. (मत्तय ५:१७, योहान : ६:३८-४०, गलती १:४, १ पेत्र २:२४, १ योहान ३:५ हे करण्याकरिता, त्याला नियमाशास्त्रानुसार आणि देवाच्या आज्ञा पालनात परिपुर्ण असणे आवश्यक होते. (इब्री ५:८-९, १ पेज १:१८-१९) येशूने ते कबूल केले. (योहान ४:३४, १४:३१, १५:१०, इब्री १०:९) त्याने देवाची कार्ये केली (योहान ९:४) देवाला हवे होते तेच शब्द तो बोलला (योहान १२:४८-५०) तो मृत्युत देखील त्याने आज्ञापालन केले. (फिलिप्पै २:८) त्याच्या पुन:जीवीत होणाऱ्यासतिच्या आज्ञा पालनामुळे आणि देवाच्या कृपेमुळे (प्रे.कृ. १:२२, रोम ३:२४-२५, ६:५-११, इफिस २:५-८, १ पेज १:३-४) सर्व स्त्री-पुरूषांना तारण उपलब्ध झाले. (रोम ५:१९-२१, करिंथ ५:१५, गलती ३:७-८, इब्री ५:८-९, तीत २:११)

येशू विश्वासू आणि पापरहित होता आणि आहे. (इब्रि २:१७, ३:२, ४:१५, १ पेज २:२२) पापरहित असल्यामुळे त्याला बाप्रिस्मा घेण्याच्या अगोदर पाप कबूली आणि पश्चापाची गरज नव्हती. परंतु बाप्रिस्मा आवश्यक होता. अनेक गोष्टीच्या द्वारे त्याचे महत्व आपल्याला पहावयास मिळते. त्याने धर्मशास्त्र पुर्ण करण्याकरिता त्याने बाप्रिस्म्याचा आग्रह धरला. शिवाय बाप्रिस्मा करणाऱ्या योहानाला बाप्रिस्मा दिल्या नंतर येशू हा देवाचा पुत्र आहे. अशी त्याजाविषयी साक्ष देणे शक्य झाले. "दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून म्हटले, हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा, देवाचा कोकरा! ज्याविषयी मी सांगितले. जो माझ्यापुढे झाला आहे. कारण तो माझ्यापुर्वी होता असा पुरूष माझ्या इस्त्राएलास प्रगट व्हावे म्हणून मी येऊन पाण्याने बाप्रिस्मा करितो." योहानाने अशी साक्ष दिली की मी आत्म्याला कबुतरासारखे आकाशांतुन उतरना पाहिले आहे. आणि तो त्याजवर राहीला. मी त्याला ओळखीत नव्हतो. तरी ज्याने मला पाण्याने बाप्रिस्मा करावयास पाठविले त्याने मला सांगितले होते. की ज्या कोणावर आत्मा उतरताना व राहतांना पाहशील तोच पवित्र आत्म्याने बाप्रिस्मा करणारा आहे. मी पाहिले आहे व साक्ष दिली आहे की हा देवाचा पुत्र आहे. (योहान १:२९-३४)

आपल्याला तेथे त्याच्या बाप्रिस्म्याचे महत्व अधिक सार्थपणे पहावयास मिळते. ज्या वेळेस पवित्र आत्मा त्याजवर उतरला आणि देवे पित्याने साक्ष दिली की तो येशूवर संतुष्ट आहे. " मग बाप्रिस्मा घेतल्यावर येशू पाण्यांतुन लागलाच वर झाला आणि पाहा, आकाश उघडले. तेव्हा त्याने देवाचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणांवर येताना पाहिला आणि पाहा, अशी आकाशवाणी झाली की हा माझा पुत्र, मला परमप्रिय, याजवर मी संतुष्ट आहे." (मत्तय ३:१६-१७) मार्क १:१०-११, लूक ३:२१-२२ पाहा) येशूने आज्ञापालना द्वारे सर्व धर्मकृत्ये पूर्ण केली. त्याच्या बाप्रिस्म्या मध्ये आणखीन एक गोष्ट साध्य झाली. ज्यामुळे त्याची धर्म कृत्य पुर्ण

केली.

## येशूने ख्रिस्ताने आपल्याला ते उदाहरण दिले.

त्याच्या बुडुन बाप्रिस्म्या द्वारे येशून आपणांस पालन करण्याकरिता उदाहरण घालून दिले. सर्व प्रथम आपण हे समजून घेतले पाहिजे की, ख्रिस्त मानवजातीकरिता केवळ मृत्युच पावला असे नाही. तर मृत्युतुन जीवंत देखील झाला. (मन्तय १६:२१), २८:५-७, प्रे.क्र. १-३, २:२३-२४, ३१-३२) त्याच्या पुनरूत्थानानंतर, तो त्याची देवाच्या उजवीकडील घेण्यासाठी स्वर्गात वर गेला. (मार्क १६:९,योहान २०:१७, प्रे. कृ.२:३–३६, ७:५५, रोम ८:३४, इफिस १:२०, इब्री ८:१, १२:२, १ पेज ३:२२) तेव्हा येशू मृत्यु पावला पुन: जीवीत झाला आणि देवाच्या उजवीकडे जाऊन बसला.

ती अनंत कालीक जीवनाच्या आत्मिक पुनरूत्थानाचा सुरवात होती. येशू ख्रिस्त हा मृतांतून प्रथम जन्मलेला आहे. (कलयै १:१८, प्रकटी १:५), तो महानिद्रा घेतलेल्याचे प्रथम पळ आहे. (१ कटिंथ १५:१९-२३) आणि तो आपल्या सर्वांना अनंत कालीक जीवन देऊ करीत आहे. (प्रे.कृ. १६:२३) रोम ६:३-१४ आणि १पेत्र ३:१८-२१, या वचनांमध्ये त्याच्या मृत्यु आणि पुना जीवीत होण्यामधील आणि आपल्या पापमय जीवनांचा आत्मिक मृत्यु आणि आत्मिक पुनरूत्थान यामधील संबंध पाहावयास मिळतो. आपला पापाचा जुना मनुष्य पाण्यात पुरला (बुडविला) गेला आहे. आणि त्या पाण्यातुन बाहेर येणे हे आपले देवामधील नवीन जीवन जगण्याची सुरवात. “तुमचा बात्रिस्मा झाला तेव्हा तुम्ही त्याजबरोबर पुरले गेला, आणि ज्याने त्याला मेलेल्यातून उठविले. त्या देवाच्या कृतीवरील त्या देवाच्या कृतीवरील विश्वासाच्या द्वारे त्याजबरोबर उठविलेली गेला. जे तुम्ही आपल्या अपराधांनी व देहस्वभावच्या बेसुंतीपणाने मेलेले होता.त्या तुम्हांस त्याने त्याजबरोबर जीवंत केले, त्याने आपल्या अपराधांची क्षमा केली.” (कळस्से २:१२-१३, ३:१-४, इब्री ९:१४-१५, १०:१–२५ तीत २:११-१४, पाहा.

मनुष्याचा पाण्याने आणि आत्म्याने नवा जन्म झाला पाहिजे असे येशू म्हणाला तेव्हा त्याचा संदर्भ बाप्रिस्माशी होता. (सी ३:३-५) तारण होण्याकरितो पाण्याच्या बाप्रिस्माद्वारे आत्मिक जीवनामध्ये नव्याने जन्म झाला पाहिजे. आणि मग आपल्यामध्ये रहाण्याकरिता पवित्र आत्मा मिळतो. (प्र.कृ. २:३८, १ करिथ ६:१९) बाप्रिस्मा त्याच्या मृत्यु, परले जाणे आणि पुन:उठण्याशी प्रतिरूप असा आहे.

त्याची लोकांमधील सेवा कार्याची सुरवात अशाप्रकारे समजु शकतो. त्याची सुरवात एक प्रकारच्या मृत्युच्या,पुरले जाण्याच्या आणि पुन:उठण्याच्या प्रतिरूपाने झाली. आणि शेवट त्याच्या प्रत्यक्षात मृत्यु परत जाणे आणि पुन: उठल्याने झाला. त्यानंतर तो वर स्वर्गात गेला. तो आपल्याला स्वर्गाचा मार्ग दाखविण्यास आपल्या पुढे धावणारा आहे. (इब्री ६:२०) त्याने तो आपल्या करिता स्थापित केला. (इबी. १०:१९-२०) तो आपल्या विश्वासाचा आणि अनंत कालीक जीवनाचा उत्पादक आहे. (इब्री ५:९, १२:२)

आपल्याला तारण हवे असल्यास आपल्याला त्या मार्गाने गेले पाहिजे. त्याचे उदाहरण अनुसरले पाहिजे. येशू ख्रिस्त पापरहित होता. त्यामुळे त्याला पाप कबुलीची किंवा पश्चाताप करण्याची गरज नव्हती. केवळ धर्मशास्त्र पुर्ण करण्यासाठी त्याला बाप्रिस्मा घ्यावा लागला. कसे ही असो आपण विश्वास ठेवला पाहिजे. (योहान १:१२, ८:२४, प्रेकृ. १६:३१, १ करिंथ १:२१, गलती ३:२२, इब्री १०:३९, ११:६, आपण आपल्या पापांबद्दल पश्चाताप केला पाहिजे. (लूक १३:५, २ करिंथ ७:१०, २ पेत्र ३:९)

ख्रिस्तावरील विश्वासाची कबूली दिली पाहिजे (पेत्र १०:३२), रोम १०:९-१० ) आणि तसा बाप्रिस्मा घेतल्यानंतर शेवटल्या पुनरूत्थानात ख्रिस्ताबरोबर स्वर्गात जाण्याची आशा बाळगून देवामध्ये जीवन जगण्याचा पराकाष्टेचा प्रयत्न केला पाहिजे. (योहान ५:२८-२९, १ करिथ १५:४२-५८, गलती ५:५ फिलीप्पै १:२०, ३:९-२१, कलस्से १:५, २७, १ थेस्सल ४:१३-१८, इब्री ३:६.

सार्वजनिक सेवेस सुरवात करण्या अगोदर येशू ख्रिस्ताचा धर्मशास्त्र पुर्ण करण्याकरिता बाप्रिस्मा झाला. तसे करून त्याने देवाची म्हणजे त्याच्या पित्याची आज्ञा पाळाली आणि आपल्याला अनुकरण करण्यास उदाहरण घालून दिले. पृथ्वीवरील त्याच्या सेवेच्या शेवटास त्याने सर्व धर्मशास्त्र पुर्ण केले होते. त्याने आपल्या करीता केलेल्या त्याच्या बलीदानाचा लाभ घेण्याची आपली इच्छा असेल तर, त्याचे उदाहरण अनुसरणे आणि आज्ञांकित रहाण्याची गरज आहे. (१ पेज १:१४)

“मला प्रभजी, प्रभुजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होईल असे नाही. तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वर्ततो त्याचा होईल.” (मत्तय ७:२१)

“यास्तव तुम्ही ख्रिस्ताबरोबर जर उठविले गेला, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे वासला आहे. तेथल्या वरील गोष्टी मिळवावयाचा चला करा.”(कलस्सै ३:१)

## कर सवलत

एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला कोणाही व्यक्ति किंवा संस्थेद्वारा देण्यात येणारी देणगी ही प्राप्तीकर कायद्याच्या ८० जी अंतर्गत कर मुक्त गणण्यात येते. या संबंधीत रकमेची अधिकृत पावती देण्यास येईल. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/ एम.ओ. या द्वारे एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टच्या नांवे पाठवावी.

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO Of HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005.** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |



## PIT TO PALACE

# खड्यातुन महालापर्यंतची मालिका

(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)

"वाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे" (मत्तय २४:१५)

# देवाची त्याच्या अवर्णनीय दानाबद्दल स्तुति करू या!

ते १९८२ साल होते! देवाच्या कृपेत कदापीबदल होत नाही. " कारण देवाला आपल्या कृपादानांचा व पाचारणाचा अनुताप होत नाही." (रोम ११:२९) परंतु परिस्थिती पुर्णपणे गोंधळाची होती. रहाण्याकरिता मदत होईल. अशी जागा नव्हती. आधार देणारा कोणीही नव्हता. सेवेमध्ये विरोध होत होता. तिरस्कार आणि दबाव होता. आधार देणाऱ्याची दुर्मिळ होते आणि माझे ऐकणारे कोणी नव्हते. जवळपासच्या भिंतीवर "धर्म परिवर्तन तंबुतील मनुष्य!,अहो, लोक हो सावध रहा!!"असे विधान लिहिण्यात आलेले होते.

मी अतिशय गोंधळलेला दिशाहीन आणि काय करावे हे सुचत नव्हते. निराश, नाऊमेद करणारे शब्द मजकडे आले ते असे. "तू ही जागा जेथे तुला विरोध झाला आहे. तो सोडून या शहरापासुन २४ किमी. दूर जा, वेळ दवडू नकोस." अशाच प्रकारचा विरोध आणि सल्ले मजकडे येत होते. तेव्हा मला निर्णय करतो भाग पडले.

एका रात्री मी अतिशय दुःखी होतो आणि निद्राहिन स्थितीत होतो. आणि सल्ला देणारा असा कोणीही जवळ नव्हता. मज सभोवती असणारे लोक विरूध्द विचारांचे होते. माझे ऐकून घेण्याच्या स्थितीत असलेल्या आणि योग्य उत्तर देण्याच्या स्थितीत नसलेल्या लोकां माझ्या सभोवती होते. मी पहाटे ४ वाजता गुडघ्यांवर जाऊन प्रार्थना करण्याचा मी निर्णय घेतला.

पहाटे पासुन प्रार्थने करिता गुडघ्यांवर जरी आलो होतो तरी समस्यांच्या दबावामुळे मुखातुन शब्द बाहेर पडत नव्हते. तरी अंत:करण मात्र माझ्या प्रभु येशूची जडलेले होते. माझा आवाज स्वर्गापर्यंत पोहचत आहे आणि माझ्या विनंतीचा स्विकार करणारा प्रभु स्मित हास्य करून, कार्य करण्यास सुरवात केली आहे असे चित्र डोळ्यांसमोर उभे करू शकलो.

वेळ कशी निघून गेली हे मला कळलेच नाही. मला तहान आणि भुक लागली नाही! त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता माझे मित्र, सध्या एको ऑफ हीज कॉल इंग्रजी मासिकांचे सहसंपादक बंधु एम. पॉलराज माझ्या घरी आले. मी त्यावेळी गुडघ्यांवर प्रार्थनेत होतो आणि त्यांचा आवाज ऐकून त्यांना भेटावयास खोलीतून बाहेर आलो.

मी जरी देहान आणि मनाने अशक्त होतो, माझ्या चेहऱ्यावर चकाकी होती. माझ्या चेहऱ्याकडे पाहून ते बोलले, अहो, बंधु तुम्ही किती ताजेतवाने दिसत आहात? काही चांगली बातमी आहे का? "मी त्यांना उत्तर दिले, मी पहाटे ४ वाजेपासुन मला फार दिवसांपासुन दडपण असलेल्या समस्ये करिता प्रार्थना करीत होतो. दडपणामुळे मुखांतुन शब्द बाहेर पडत नव्हते, तरी मनामध्ये मी देवाला प्रार्थना करीत होतो.

आमचे बोलणे सुरू असताना अचानक त्यांनी मला सांगितले, बंधु देव आपला देव तुमच्या बाबतीत किती तरी चांगला आहे! आपण दोघेही खेडेगावात शाळेत शिकलो, परंतु देवाने तुम्हाला चेपॉक मध्ये राज्यांच्या मुख्यालया जवळ घेऊन आला आहे. त्याने तुम्हाला या जागी शुभवर्तमान न पोहचलेल्या आणि कठीण अशा विभागांमध्ये उपदेश करण्यासाठी ठेविले आहे. किती आश्चर्यकारक अशी ही गोष्ट आहे? "यशया २:३ आणि मिखा ४:२ या वचनांत म्हटले आहे." सीयोनांतुन शिक्षण व यरूशलेमांतुन परमेश्वराचे वचन निघेल. तेव्हा देव तुमच्याद्वारे या विभागाला आणि देशातील सर्व विभागांना जीवनी प्रकाश देणार आहे. किती अद्भुत! देवाने अगदी योग्य वेळी मला माझ्या समस्यांवर उपाय सुचाविण्यास त्याच्या लेकराला मजकडे पाठविले. देवाने माझ्या प्रार्थनेचे उत्तर दिले.

देवाच्या प्रिय लेकरांनो, तुम्ही कठीण परिस्थीतीतुन जात आहात का? निराश, माऊभेद होऊ नका. अरण्यात असलेल्या हग्गार ची स्थिती देखील देवाने पाहिली. "देवाने मुलाची दीनवाणी ऐकली व देवाच्या दूताने आकाशांतून हाक मारून हागारेला म्हटले, हागारे तुं कष्टि का? भिऊ नको, कारण मुल आहे. तेथून देवाने त्याची दीनवाणी ऐकली आहे." (उत्प्रस्ति २१:१७) चिकाटीने प्रार्थना करीत राहा. देव तुमच्या जीवनात चांगले घडविल! "कारण परितोषिक निश्चये मिळणार."तुझी आशा नष्ट होणार नाही." (नीतिसुत्रे २३:१८)

## A Loving Request

As you all know we are hard-pressed to meet several needs like the salary of the staff, expenses for the purchase of paper and also the travel expenses. Generally we never ask others to meet our financial needs. But we request those who truly love this ministry to send your offerings through Money Orders, Cheque or Demand Draft, Phone Pay, NEFT or through any other methods and support us in this Ministry. The Lord will surely bless you. For details call: +91 98412 71858 / 98410 71858

**- Editor, Echo of His Call**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

# ECHO OF HIS CALL

**Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.**

**Annual Subscription : Rs. 100/- Life Subscription : Rs. 2000/-**

The multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offerings and donations of the God's Children like you. You may support **Echo of His Call** and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new addresses.

**Echo of His Call** is available in 16 languages in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get blessed.

Your letters, prayer requests and your financial helps (by D.D., Cheque, M.O. etc.) to **ECHO OF HIS CALL** may be sent to the address below.

Please send your **Land Phone / Mobile Phone Numbers and E.mail addresses** for updation.

## ECHO OF HIS CALL

10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk,
Chennai - 600 005, India
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell: (+91) 98410 71852, 95661 31858
E-mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO**

## PLEASE PRAY FOR OUR MINISTRIES AT THE HEADQUARTERS

1. Prayer Service : 24 hours
2. **BIBLECOR -** Bible Correspondence Courses : English, Tamil & Hindi
3. **ECHO OF HIS CALL** - Monthly Magazines : English, Tamil, Malayalam, Telugu, Hindi, Kannada, Marathi, Gujarati, Bengali, Odiya, Nepali, Assamese, Punjabi, Urdu, Sinhala & Afrikaans.
4. Nehemiah Bible Colleges (Two Centres)
5. Theological Correspondence Courses: English & Tamil
6. Great Commission Partners (Network of Pastors)
7. Training Programmes
8. Crusades
9. Literature Distribution and Follow Up
10. Gospel Printing Press - Publications
11. St. Paul's Matriculation School - Village English High School
12. Sunday Schools : 8.30 a.m. & 4.00 p.m. Sunday
13. **Tamil Services : 5.30 a.m. , 7.00 a.m. & 10.00 a.m. Sunday**
14. **Malayalam Service : 2.00 p.m. Sunday**
15. **Telugu Service : 4.00 p.m. Sunday**
16. **Hindi Service : 5.00 p.m. Sunday**
17. **English & Tamil Service : 6.00 p.m. Sunday**
18. Pastors' Counselling : 4.00 p.m. Sunday
19. Women's Prayer : 5.30 p.m. Wednesday
20. Mid-week Bible study : 6.30 p.m. Wednesday
21. Men's Prayer : 7.00 p.m. Friday
22. Workers' Meeting : 6.00 p.m. Saturday
23. House Meetings : 6.30 p.m. Monday & Tuesday
24. Special Holy Communion : 5.30 a.m. 1st day of each month
25. Ministers Review Meeting : 5.30 p.m. First Saturday
26. Parents' Prayer : 4.00 p.m. First Sunday
27. Night Prayer : 9.30 p.m. Second Friday
28. Fasting Prayer : 9:30 a.m. Third Saturday
29. Holy Communion : Second Sunday Services
30. Morning Devotion : 5.30 a.m. daily
31. Staff Devotion : 9.00 a.m. daily
32. Office : 9.00 a.m. to 9.00 p.m. (except Sundays)

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"
on 12th FEBRUARY 2021
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**